# MPSC

# प्रचलित घडामोडी

## स्पेशल कोर्स (मराठी)




Headlines: २१ ते २४ फेब्रुवारी २०२०

२५ फेब्रुवारी २०२०

# हेडलाईन्स

## स्वच्छ भारत अभियानाचा (ग्रामीण) द्वितीय टप्पा जाहीर : वर्ष 2020-21 ते वर्ष 2024-25

- 19 फेब्रुवारी 2020 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत वर्ष 2024-25 पर्यंत चालणाऱ्या स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) याच्या द्वितीय टप्प्याला मंजुरी देण्यात आली.
- हागणदारी मुक्त प्लस (ODF प्लस) या योजनेच्या द्वितीय टप्प्यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. हागणदारी मुक्त वातावरण शाश्वत ठेवणे तसेच घन व द्रव कचरा व्यवस्थापनाचा यात समावेश आहे.
- प्रत्येकजण स्वच्छतागृहाचा वापर करणार याची खातरजमा करण्यावरही या कार्यक्रमाच्या अंतर्गत लक्ष ठेवण्यात येणार आहे.
- अभियानाच्या द्वितीय टप्प्याची अंमलबजावणी करण्यासाठी वर्ष 2020-21 ते वर्ष 2024-25 या काळासाठी 1,40,881 कोटी रुपये एवढा एकूण खर्च अपेक्षित आहे.
- त्यापैकी 52,497 कोटी रुपये एवढा निधी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून पुरवला जाणार तर उर्वरित निधी घन व द्रव कचरा व्यवस्थापनासाठी 15वे वित्त आयोग, मनरेगा योजना आणि महसूल निर्मितीच्या अंतर्गत पुरवला जाणार आहे.
- सध्याच्या निकषानुसार, वैयक्तिक घरगुती स्वच्छतागृहासाठी असलेली 12,000 रुपयांची प्रोत्साहनपर रक्कम या कार्यक्रमासाठी ठेवण्यात येणार आहे. केंद्र आणि राज्य यांच्या निधीचा वाटा ईशान्य आणि हिमालयीन राज्यांसाठी आणि जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेशासाठी 90:10 तर इतर राज्यांसाठी 60:40 आणि इतर केंद्रशासित प्रदेशांसाठी 100:00 अशा प्रमाणात राहणार.
- या व्यतिरिक्त, ग्राम पातळीवरील सामुदायिक स्वच्छता गृह बांधण्यासाठी ग्रामपंचायतींना दिली जाणारी आर्थिक मदत 2 लक्ष रुपयांवरून 3 लक्ष रुपये करण्यात आली आहे.

**स्वच्छ भारत अभियानाविषयी**

- स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) याची सुरुवात 2 ऑक्टोबर 2014 रोजी झाली.
- त्याकाळी देशात ग्रामीण पातळीवर स्वच्छतेचे प्रमाण केवळ 38.7 टक्के होते. तेव्हापासून आतापर्यंत योजनेच्या अंतर्गत 10 कोटींहून अधिक वैयक्तिक स्वच्छतागृहे बांधण्यात आली आहे.
- परिणामी, सर्व राज्यांमधल्या ग्रामीण भागांनी 2 ऑक्टोबर 2019 रोजी स्वत:ला हागणदारीमुक्त घोषित केले.

## 2020-21 या वर्षापासून RBI चे लेखा वर्ष आणि सरकारचे वित्त वर्ष एकच असणार

- भारतीय रिझर्व्ह बँकेचे लेखा वर्ष (अकाउटिंग इअर) आणि भारत सरकारचे वित्त वर्ष (फायनान्शिअल इअर) 2020-21 या वर्षापासून एकच करण्याची शिफारस समितीने केली आहे.
- सध्या भारतीय रिझर्व्ह बँकेचे लेखा वर्ष 1 जुलै ते 30 जून असून, वित्त वर्ष 1 एप्रिल ते 31 मार्च असे आहे. या निर्णयानुसार, दोन्ही वर्षे जुळविल्यास रिझर्व्ह बँकेला अंतरिम लाभांश देण्याची गरज पडणार नाही.

**भारतीय रिझर्व्ह बँक**

- भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) ही भारत सरकारने स्थापना केलेली व चालवलेली मध्यवर्ती पतपेढी आहे.
- RBI ची स्थापना दिनांक 1 एप्रिल 1935 रोजी करण्यात आली. त्याचे मुख्य कार्यालय मुंबई (महाराष्ट्र) येथे आहे. RBI चे 1949 साली भारत सरकारद्वारे राष्ट्रीयीकरण गेले आहे.
- RBI वार्षिक तसेच तिमाही आर्थिक धोरण व पतधोरण जाहीर करते.
- भारतीय रिझर्व बँकेचे प्रमुख उद्देश : भारतीय चलनी नोटांची छपाई गरजेनुसार करणे, भारताचा FDI प्रवाह (गंगाजळी) राखणे, भारताची आर्थिक स्थिती राखणे, भारतीय चलन आणि पत यांचे रक्षण करणे.
- RBI ने शैली आणि दृष्टीकोन डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या 'दि प्रॉब्लेम ऑफ रूपी: इट्स् ओरिजिन अँड इट्स् सोल्यूशन' या पुस्तकातून घेतले.

- सर ओस्बॉर्न स्मिथ हे RBI चे पहिले गव्हर्नर (1 एप्रिल 1935 ते 30 जून 1937) होते. सर चिंतामण द्वारकानाथ देशमुख हे पहिले भारतीय मुळ निवासी गव्हर्नर (तिसरे गव्हर्नर) 11 ऑगस्ट 1943 रोजी या पदावर विराजमान झाले.
- सध्या शक्तिकांत दास गव्हर्नर आहेत. बी. पी. कानुंगो, एन. एस. विश्वनाथन, महेश कुमार जैन आणि मायकल पात्रा असे चार डेप्युटी गव्हर्नर आहेत.

## भारताच्या 22व्या विधी आयोगाच्या केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत भारताच्या 22व्या विधी आयोगाच्या स्थापनेला आज मंजुरी देण्यात आली. सरकारी राजपत्रात यासंबंधीचा आदेश प्रकाशित झाल्यापासून तीन वर्षे या आयोगाचा कालावधी राहील.
- आयोगाकडे अभ्यासासाठी आणि शिफारसीसाठी सोपवण्यात आलेल्या कायद्याच्या विविध पैलूबाबत, सरकारला योग्य, वैशिष्ट्यपूर्ण शिफारसींचा लाभ होईल.
- विधी आयोग, स्वतः केंद्र सरकारने सोपवलेल्या कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी संशोधन आणि आढावा घेईल. न्याय जलद गतीने देता यावा, खटले लवकर निकाली काढता यावेत, खटल्यासाठी खर्च कमी राहावा या दृष्टीने न्याय प्रदान करण्याच्या व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठीही हा आयोग, अभ्यास आणि संशोधन हाती घेऊ शकेल.
- कालबाह्य झालेले कायदे, जे तातडीने रद्दबादल करता येतील असे कायदे हा आयोग निश्चित करेल. सरकारने आयोगाकडे सोपवलेल्या कायद्याबाबत आपले मत सरकारला कळवेल. सरकारने सांगितल्यास, दुसऱ्या देशांनी संशोधनासाठी केलेल्या विनंतीबाबत विचार करेल.
- शिफारसींना अंतिम स्वरूप देण्यापूर्वी आयोग, मुख्य संबंधित मंत्रालय आणि संबंधिताशी चर्चा करेल.

**पार्श्वभूमी :**

- विधी आयोग प्रथम 1955 मध्ये स्थापन झाला आणि दर तीन वर्षांनी त्याची पुन:स्थापना करण्यात येते.
- 21 व्या विधी आयोगाची मुदत 31 ऑगस्ट 2018 पर्यंत होती.

## 1 एप्रिल 2020 पासून 'BS6' ची होणार अंमलबजावणी

- प्रदूषणाला आळा घालण्याच्या उद्देशाने BS4 वाहनांची येत्या 1 एप्रिलपासून देशभरातील विक्री थांबवली जाणार आहे.
- केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या आदेशाला मुदतवाढ देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिल्याने 1 एप्रिल 2020 पासून देशात 'BS6' वाहनांची विक्री करणे बंधनकारक करण्यात आले आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने 22 फेब्रुवारी 2016 ला 'BS6' वाहनांच्या सक्तीविषयी अधिसूचना काढली होती. त्यानुसार 1 एप्रिल 2020 आणि त्यानंतर उत्पादित होणाऱ्या आणि 3500 किलो वजनापर्यंतच्या वाहनांची उत्सर्जन मानके (इमिशन स्टँडर्ड) 'BS6' च्या निकषांप्रमाणे असणे बंधनकारक केले.
- त्यामुळे आता वाहन उत्पादक कंपन्यांसमोर 'BS4' वाहने 31 मार्चपर्यंत विकण्याचे मोठे आव्हान असणार आहे.

**'BS' मानांकनाचा प्रवास :**

- BS2 - 2005
- BS3 - 2010
- BS4 - 2017
- BS6 - 2020

**BS मानके म्हणजे काय?**

- BS म्हणजे 'भारत स्टँडर्ड स्टेज' होय.
- इंजिनाच्या अंतर्गत वहनामुळे होणाऱ्या प्रदूषणाच्या नियंत्रणासाठी केंद्र सरकारने दिलेले मानक म्हणजे 'बीएस' होय. यावर केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नियंत्रण ठेवले जाते.

**महत्त्वाचे :**

- बीएस मानके ही भारतात धावणाऱ्या सर्व वाहनांसाठी लागू आहेत.
- सध्या देशात 'BS-4' वाहनांची सक्ती असून 1 एप्रिल 2017 पासून 'BS3' वाहनांचे उत्पादन व विक्री बंद करण्यात आली होती.
- वाहनांच्या इंजिनमुळे होणाऱ्या प्रदूषणावर आळा

घालण्यासाठी बीएस मानांकनात वेळोवेळी सुधारणा होत असते. BS मानांकन त्याचाच एक भाग असून कमीतकमी वायुप्रदूषणाच्या दृष्टीने आता भारतामध्ये BS6 इंजिन बंधनकारक आहे.

**याचा काय फरक पडणार :**

- BS4 वाहनांमधून '50 पीपीएम' कार्बन उत्सर्जित होतो तेच प्रमाण BS6 वाहनातून '10 पीपीएम' असणार आहे असा दावा केला जातो. त्यामुळे प्रदूषणात मोठ्या प्रमाणावर घट होणार आहे.

## आरोग्य मंत्रालयाचा शालेय सुदृढ शारीरिक आरोग्य सदिच्छादूत उपक्रम

- केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या वतीने 12 फेब्रुवारी 2020 रोजी नवी दिल्लीत शालेय सुदृढ शारीरिक आरोग्य सदिच्छादूत उपक्रमाचा शुभारंभ केला गेला. हा 'आयुषमान भारत' योजनेच्या अंतर्गत चालविला जाणारा कार्यक्रम आहे. या कार्यक्रमामधून शालेय विद्यार्थ्यांच्या विकासाला मिळण्यास मदत होईल.

**उपक्रमाविषयी :**

- समाजात आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी प्रत्येक शाळेतल्या दोन शिक्षकांची सुदृढ शारीरिक आरोग्य सदिच्छादूत म्हणून केंद्र सरकार नियुक्ती करणार आहे.
- हा उपक्रम सुरुवातीला 200 जिल्ह्यांमध्ये राबवला जाणार आहे. अंमलबजावणीच्या पहिल्या टप्प्यात आकांक्षी जिल्ह्यांमधल्या सर्व सरकारी उच्च प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांचा समावेश असणार.
- दूत वर्ग प्रमुखाच्या माध्यमातून काम करतील. वर्ग प्रमुख 'हेल्थ अँड वेलनेस मेसेंजर' म्हणून काम करणार.

## वारसा वास्तूंच्या पुनरुज्जीविकरणासाठी कर्नाटक सरकारची 'समरक्षणे' योजना

- राज्यभरातल्या ऐतिहासिक वारसा असलेल्या असूचीबद्ध वास्तूंच्या पुनरुज्जीविकरणासाठी कर्नाटक राज्य सरकारने नवी 'समरक्षणे' योजना आणली आहे.
- उद्देश : भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (ASI) किंवा कर्नाटक पुरातत्त्व विभागाकडून नोंद न घेण्यात आलेल्या ऐतिहासिक महत्त्व असलेली स्मारके आणि इमारतींचे जतन करणे.

**ठळक बाबी :**

- राज्यभरातल्या 25,000 हून अधिक मंदिरे, मशिदी, चर्च, इमारती आणि इतर स्मारकांकडे लक्ष देण्याची गरज आहे.
- धर्मस्थल मंजूनाथेश्वर धर्मस्थान ट्रस्टने (SDMDT) गेल्या 20 वर्षांत 176 मंदिरांचे जीर्णोद्धार केले आहे.
- गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात राज्य सरकारने स्मारक स्थळांच्या संशोधनात्मक कार्यासाठी 3-डी मॅपिंग तंत्रज्ञानाद्वारे नकाशा तयार करण्यासाठी 844 संरक्षित स्मारकांची ओळख पटवली.

**कर्नाटक राज्य**

- कर्नाटक हे दक्षिण भारतातले एक राज्य आहे. राज्याची स्थापना दिनांक 1 नोव्हेंबर 1956 रोजी म्हैसूर राज्य म्हणून झाली; 1973 साली या राज्याला वर्तमान नाव मिळाले. कन्नड ही राज्याची मुख्य भाषा आहे. राज्याची राजधानी बंगळूरू हे शहर आहे.
- राज्याच्या पश्चिमेला अरबी समुद्र व गोवा हे राज्य आहे, उत्तरेला महाराष्ट्र, पूर्वेला आंध्रप्रदेश आणि दक्षिणेला केरळ व तामिळनाडू ही राज्ये येतात.

## जगातील टॉप 100 विद्यापीठांमध्ये भारतातील 11 विद्यापीठांचा समावेश

- टाइम्स हायर एज्युकेशनच्या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांच्या देशांत यावर्षी 11 भारतीय विद्यापीठांनी स्थान पटकावले आहे. 2015 पासून भारताला हे सर्वात जास्त प्रतिनिधित्व मिळाले आहे.
- 2015 पासून पहिल्या 100 विद्यापीठांत 11 भारतीय विद्यापीठांनी स्थान पटकवण्याची ही दुसरीच वेळ आहे. टाइम्स हायर एज्युकेशनच्या माहितीनुसार पहिल्या 100 विद्यापीठांमध्ये चीनच्या सर्वात जास्त 30 विद्यापीठांचा समावेश झाला आहे. या रँकिंगसाठी 47 देश आणि विभागांचा समावेश करण्यात आला होता. एकूण 533 विद्यापीठात एकूण 56 भारतीय विद्यापीठांनी फुल रँकिंग मिळवले.
- टॉप भारतीय विद्यापीठात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगळूरूने प्रथम स्थान पटकावले होते, त्याला 16 वा क्रमांक मिळाला. IIT, खरकपूर आणि IIT, मुंबई यांना अनुक्रमे 32 आणि 34 वे स्थान मिळाले. ह्यूमन रिसोर्सेस डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इमिनन्स

स्कीममध्ये भाग घेतलेल्या विद्यापीठांपैकी एक अमृत विश्व विद्यापीठाने प्रथमच पहिल्या 100 संस्थांच्या यादीत 51 वे स्थान पटकावले.

- 2019 मध्ये हे विद्यापीठ 141 व्या स्थानी होते.

## संजय कोठारी यांची केंद्रीय दक्षता आयुक्त (CVC) पदावर नेमणूक

- ही नियुक्ती शरद कुमार ह्यांच्या जागेवर झाली आहे.
- या नियुक्ती व्यतिरिक्त केंद्रीय माहिती आयुक्त (CIC) पदावर वर्तमानात माहिती आयुक्तपदी कार्यरत असलेले बिमल जुल्का ह्यांचीही निवड केली गेली आहे.

**केंद्रीय दक्षता आयोग**

- केंद्रीय दक्षता आयोग (Central Vigilance Commission) ही एक सर्वोच्च सरकारी संस्था आहे जी केंद्र सरकारच्या अंतर्गत होणाऱ्या भ्रष्टाचाराला तोंड देण्यासाठी 11 फेब्रुवारी 1964 रोजी स्थापन करण्यात आली.
- 2003 साली आयोगाला वैधानिक दर्जा बहाल केला.
- मुख्यालय : नवी दिल्ली
- रचना : एक केंद्रीय दक्षता आयुक्त आणि जास्तीत जास्त दोन दक्षता आयुक्त

## अंटार्क्टिकावर प्रथमच नोंदविले गेले 20 अंश सेल्सिअस तापमान

- 9 फेब्रुवारी रोजी अंटार्क्टिकावरील सेमुर द्वीपावर उभारलेल्या संशोधन स्थानकावर 20.75 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. अंटार्क्टिकावर नोंदविले गेलेले हे आजपर्यंतचे सर्वाधिक तापमान आहे.
- यापूर्वी 1982 साली 19.8 अंश सेल्सिअस एवढे तापमान साईनी बेटावर नोंदविले गेले होते व हे आतापर्यंतचे सर्वाधिक तापमान होते. जागतिक तापमान वाढीचा परिणाम असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

**महत्त्वाचे :**

- अंटार्क्टिकातील अत्यंत दूरच्या भागातील संशोधन केंद्रांवर दर तीन दिवसांनी तापमान नोंदविले जाते.
- तज्ज्ञांच्या मते, 1979 ते 2017 या कालावधीत अंटार्क्टिकातील हिमावरण 6 टक्क्यांनी कमी झाले आहे.
- पृथ्वीचे उत्तर ध्रुव म्हणजेच अंटार्क्टिकावरील 'एल्समेयर' आयलंडमध्ये जुलै 2019 मध्ये 21 अंश सेल्सिअस तापमान नोंदविले गेले होते.

**अंटार्क्टिकाविषयी :**

- पृथ्वीवरील सात खंडापैकी एक – पृथ्वीचा दक्षिण ध्रुव. ('रोल्ड अमुंडसेन' हा दक्षिण ध्रुवावर पोहचणारा पहिला व्यक्ती होय.)
- अंटार्क्टिकाचे क्षेत्रफळ –एक कोटी 33 लाख 77 हजार चौ. किमी
- दक्षिण अमेरिकेच्या भूप्रदेशापासून 970 किमी दूरवर याचे स्थान आहे.
- अंटार्क्टिका खंडावरील पर्वते – मार्कहॅम, सायपल, लिस्टर इत्यादी.
- येथील रॉस बेटावर 'माउंट एरेबस' हा 3736 मीटर उंचीचा जागृत ज्वालामुखी आहे.
- खंडाची सरासरी उंची 1800 मीटर असून ती इतर कोणत्याही खंडाच्या सरासरी उंचीपेक्षा पुष्कळ अधिक आहे.
- अंटार्क्टिका खंडावर जगातील सर्वात कमी तापमान आढळते. येथील अंतर्भागातील तापमान उणे $40^0$ ते उणे $70^0$ पर्यंत असते .
- येथे बर्फाचे प्रचंड थरांवर थर साठलेले आहेत.
- अंटार्क्टिकावर जीवसृष्टी बहुतेक नाहीच. केवळ काही शेवाळाच्या जातीच्या वनस्पती व एक दोन प्रकारची फुलझाडे व गवताचे प्रकार येथे आहेत.

**भारताचा अंटार्क्टिक कार्यक्रम :**

- भारताच्या अंटार्क्टिक कार्यक्रमाला 1981 मध्ये सुरुवात झाली. आणि 1983 साली भारताने अंटार्क्टिका करारावर स्वाक्षरी केली.

**भारताची अंटार्क्टिकावरील संशोधन स्थानके :**

1) दक्षिण गंगोत्री – भारताचे अंटार्क्टिकावरील पहिले कायमस्वरूपी संशोधन स्थानक. स्थापना : 1983

2) मैत्री – अंटार्क्टिकावरील दुसरे कायमस्वरूपी संशोधन स्थानक. स्थापना : 1989

3) भारती – तिसरे संशोधन स्थानक.
स्थापना – 2012

**भारताची अंटार्क्टिकावरील संशोधन स्थानके :**

1) हिमाद्री– स्थापना –2008

2) 'IndARC'– स्थापना –2014.

- या संशोधन स्थानकांमार्फत तेथील वातावरण, जीवावरण, रासायनिक व वैद्यकीय विज्ञान यासंदर्भात संशोधन केले जाते.
- 'राष्ट्रीय ध्रुवीय व समुद्री संशोधन केंद्र' जे की पृथ्वी व विज्ञान मंत्रालयांतर्गत येते याच्यामार्फत भारताच्या अंटार्क्टिक कार्यक्रमाचे नियंत्रण केले जाते.
- राष्ट्रीय ध्रुवीय व समुद्री संशोधन केंद्र व समुद्री विकास विभाग यांमार्फत अंटार्क्टिकावर संशोधन करणाऱ्यांची निवड केली जाते व त्यासाठी आवश्यक वित्तपुरवठा केला जातो.

## सचिन तेंडुलकरला क्रीडा विश्वातील ऑस्कर

- 2011 विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात धोनीने कुलसेखराच्या गोलंदाजीवर षटकार लगावत भारताला जगज्जेता बनवले. त्या षटकाराबरोबरच सचिनचे भारताला विश्वचषक जिंकून देण्याचे स्वप्न पूर्ण झाले होते.
- 2 एप्रिल 2011 रोजी विश्वचषक विजयानंतर संघातील खेळाडूंनी सचिनला आपल्या खांद्यावर उचलून घेऊन संपूर्ण स्टेडियमला फेरी मारली होती. यादरम्यान सचिन आपल्या चाहत्यांना अभिवादन करत होता. त्यावेळी टिपलेल्या क्षणाला 2000-2020 या कालावधीमधील क्रीडा विश्वातील सर्वोत्कृष्ट क्षण म्हणून पुरस्कार मिळाला आहे.
- त्या क्षणाला 'कॅरिंग ऑन द शोल्डर ऑफ ए नेशन' शीर्षक देण्यात आले आहे.
- क्रीडा विश्वातील ऑस्कर म्हणून ओळख असलेल्या लॉरियस स्पोर्ट्स् अॅवार्डने सचिनच्या त्या क्षणाला सन्मानित करण्यात आले आहे.
- 2000-2020 या 20 वर्षांमध्ये क्रीडा विश्वातील हा सर्वात भावुक आणि प्रेरणा देणारा क्षण होता.
- जर्मनीची राजधानी बर्लिन येथे या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

**लॉरियस पुरस्कार**

- लॉरियस किंवा लॉरेस स्पोर्ट्स अॅवॉर्ड हा क्रीडा जगतातील व्यक्ती आणि संघांचा सन्मान करणारा वार्षिक पुरस्कार सोहळा आहे. लॉरेन्स स्पोर्ट्स् फॉर गुड फाऊंडेशन या संस्थेचे संस्थापक डेलमर आणि रिचमोंट यांनी 1999 मध्ये याची स्थापना केली होती. हा पुरस्कार जर्मनी देशाकडून दिला जातो.

**लॉरेन्स पुरस्कार 2020चे इतर विजेते:**

- स्पोर्टसमन ऑफ द इअर : लेविस हॅमिल्टन आणि लिओनी मेस्सी
- स्पोर्ट्स् वुमन ऑफ द इअर- सीमोने बिल्स
- स्पोर्ट्स् पर्सन विथ डिसअॅबिलिटी- ओकसना मास्टर

## 19 फेब्रुवारी 2020 : मृदा आरोग्य पत्रिका दिवस

**मृदा आरोग्य पत्रिका योजना:**

- नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 19 फेब्रुवारी 2015 रोजी राजस्थानमधल्या सुरतगड या ठिकाणी मृदा आरोग्य पत्रिका योजनेचे उद्घाटन.
- उद्देश : शेत जमिनीतील पोषक द्रव्यांच्या कमतरतेचा शोध घेणे.
- या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना दर दोन वर्षांनी मृदा आरोग्य कार्ड दिले जातात.
- देशातल्या सर्व शेतकऱ्यांना मृदा आरोग्य पत्रिकांचे वाटप करण्यासाठी ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.
- मातीचे आरोग्य आणि तिची उत्पादकता सुधारण्यासाठी, शेतकऱ्यांना त्यांच्या शेतजमिनीतल्या पोषक द्रव्यांची स्थितीची माहिती मिळण्यासाठी ही योजना आहे.
- 'मृदा आरोग्य पत्रिका' योजनेमुळे गेल्या पाच वर्षात पिक उत्पादनात सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून आले आहे.
- पहिला टप्पा : 2015 ते 2017
- दुसरा टप्पा : 2017 ते 2019
- योजनेअंतर्गत आतापर्यंत 429 नवीन स्थायी मृदा चाचणी प्रयोगशाळा, 102 फिरत्या प्रयोगशाळा, 8752 छोट्या प्रयोगशाळा आणि 1562 ग्रामस्तरीय प्रयोगशाळांना परवानगी देण्यात आली आहे.

## ठळक घडामोडी

1) घटस्फोटित महिलांना निवृत्ती वेतन – उत्तर प्रदेश सरकारचा निर्णय.

2) राजस्थानातील बिकानेर येथे देशातील पहिले 'डॉक्युमेंट्स् म्युझियम' साकारले जाणार– येथे शिवरायांवर विशेष दालनाची निर्मिती केली जाईल.

3) महिलांना लष्करात स्थायी कमिशन (कायमस्वरूपी नियुक्ती) देण्यात यावे यावर सर्वोच्च न्यायालयाकडून शिक्कामोर्तब व सरकारला आदेश.

4) 2022 पासून सैन्यात थिएटर (संयुक्त) कमांड कार्यान्वित होईल – सीडीएस जनरल बिपिन रावत यांची घोषणा.

5) 'मुडीज इन्व्हेस्टर सर्व्हिस'ने भारताचा 2020 साठीचा वृद्धीदर अंदाज 6.6 टक्क्यांवरून घटवून 5.4 टक्के केला.

6) सातबारा, शासनाच्या योजना, पीक पाहणी लिंक करून खऱ्या लाभार्थी शेतकऱ्यांना लाभ मिळण्यासाठी केंद्र सरकार 'शेतकऱ्यांचा डेटाबेस' तयार करणार.

7) शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी केंद्र सरकार देशात 10845 माती परीक्षण प्रयोगशाळांची निर्मिती करणार.

8) 1 एप्रिलपासून भारतात मिळणार जगातील सर्वोत्तम इंधन – 'युरो चार' ऐवजी 'युरो सहा' दर्जाचे पेट्रोल डिझेल मिळणार.

9) भारतीय सैन्याचे नवे मुख्यालय 'दिल्ली कँट' मध्ये स्थलांतरित करण्याचे नियोजित.

10) निजामाच्या खजिन्यातील 324 कोटी रुपयांची रक्कम ब्रिटनकडून भारताला हस्तांतरित.

11) ग्रामीण भागात इंटरनेट कनेक्टिव्हिटीसाठी बीएसएनएलची 'भारत एअर' योजना.

12) जागतिक इनोव्हेशन इंडेक्स भारत 52 व्या स्थानी.

13) केंद्रीय दक्षता आयुक्तपदी संजय कोठारी यांची नियुक्ती.

14) चक्रीवादळाची स्थिती अभ्यासण्यासाठी भारतात ठीकठिकाणी 'डॉपलर रडार' उभारण्याची हवामान खात्याची योजना.

15) 'नेताजी–अ बायोग्राफी फॉर यंग्स' या पुस्तकाच्या लेखिका व मा. खासदार कृष्णा बोस यांचे निधन.

15) 'ऑपरेशन माँ' : दहशतवाद्यांसाठीची भारतीय सैन्याची मोहीम.

16) 'कट, कॉपी– पेस्ट' या संगणक प्रणालीचे जनक 'लँरी टेसलर' यांचे निधन.

17) बाल आरोग्य व आनंदी निर्देशांकात भारत 131 वा – 'यूएन'चा अहवाल.

18) पंढरीनाथ पठारे यांना महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती जीवनगौरव पुरस्कार प्राप्त.

19) छत्रपती शिवाजी महाराज जयंती :19 फेब्रुवारी

20) जागतिक सामाजिक न्याय दिवस : 20 फेब्रुवारी

21) आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन : 21 फेब्रुवारी.

22) मृदा स्वास्थ्य कार्ड दिवस – 19 फेब्रुवारी.

23) निजामाच्या खजिन्यातील 324 कोटी रुपयांची रक्कम ब्रिटनकडून भारताला हस्तांतरित.

24) टू वे ब्लॉकचेन रिमोट वोटिंग प्रणाली : दुसऱ्या मतदारसंघातूनही मतदान करता येणार– निवडणूक आयोगाकडे प्रस्तावित.